## 5. पुराणकथांची स्त्रीविषयक नीतिधारणा.

बायबलच्या ' जुन्या करारा'त ईव्हच्या निर्मितीची एक कथा आलेली आहे. आदमच्या बरगडयांपासून ईव्हची निर्मिती झाली असे ती कथा सांगते. अर्थातच स्त्रीचे गौणत्व बायबलमधील ही कथाच केवळ सांगत असे नव्हे तर भारतातही प्रामुख्याने उत्पत्तिकथा स्त्रीला अत्यंत हीन लेखल्याचे सांगतात. अर्थात हे आपण उत्पत्तिकथांच्या प्रकरणात पाहिलेच आहे. ऐतरेय ब्राह्मण ग्रंथातही ' मुलगा हा कुटुंबाच्या आशेचा उगम आहे तर मुलगी ही कुटुंबाच्या दुःखाचे उगमस्थान आहे. ' मनुस्मृतीच्या मते विधात्याने स्त्रीत तीव्र विषयवासना, अलंकारांचा लोभ, अपवित्र भावना, राग, अप्रामाणिकपणा व नीतिबाह्य वर्तनाचे बीज जन्मतःच घालून ठेवलेले आहे !

अशाप्रकारे स्त्रीबद्दल स्मृती कितीही कठोरपणे बोलली असली तरीही पुराणकथांनी रंगविलेल्या स्त्रियांनी समाजात आदर्श निर्माण केलेले आहेत. पतीशी मनाने एकरूप होऊन त्याच्या सुखात स्वतःचे सुख पाहणारी, पवित्र , धैर्यवान, सहनशील साध्वी सीता, संकटे हीच जणू ध्येयवादी जीवनाची खरी निकषस्थले असतात असेच जणू सूचविणारी, युधिष्ठिराच्या वनवासी व अज्ञातवासी जीवनात सावलीसारखी राहणारी आज्ञाधारक, निग्रही द्रौपदी, क्षात्रधर्माभिमानी विदुला, ब्रह्मवादिनी गार्गी अशा अनेक स्त्रियांनी समाजकारण, राजकारण, धर्मकारण वगैरे अनेकप्रकारच्या क्षेत्रांत मोलाची कामगिरी केलेली आहे. या स्त्रियांच्या अनेक कथा आहेत. या कथांतील काही प्रातिनिधिक स्त्रियांच्या कथा, त्या कथांमध्ये आलेली नैतिकता, अनैतिकता यांची चिकित्सा येथे करणार आहे.

MARR. BA... ...KAR LIBRARY
SHIVAJI U...S...Y. KOLHAPUR

**सत्यकाम जबाला :**

सर्वप्रथम छांदोग्य उपनिषदातील कथा पाहू. जबाला नामक स्त्रीचा पुत्र सत्यकाम हा विद्याध्ययनासाठी गौतम ऋषींकडे गेला. गौतमाने त्याला गोत्र विचारले पण सत्यकामाला ते ठाऊक नव्हते

म्हणून तो ते आपल्या आईला विचारायला गेला. आई त्याला म्हणाली, " मला तुझा पिता कोण ते माहीत नाही. तारुण्यात इतस्ततः भटकत असता तू माझ्या पोटी आलास त्यामुळे तुझे गोत्र सांगता येणार नाही." सत्यकामाने ते ऐकले आणि जसेच्या तसे गौतमाला जाऊन सांगितले ते ऐकून गौतम म्हणाला, " तू ब्राह्मणपुत्रच आहेस. अब्राह्मण इतक्या धीटपणे सत्य सांगू शकणार नाही. अत एव मी शिष्य या नात्याने तुझा स्वीकार करतो."[2]

येथे प्रथमतः खुलासा करणे आवश्यक आहे की, गौतमाने सत्यकामाचा शिष्य म्हणून स्वीकार केला खरा परंतु त्यासाठी गौतमाने दिलेले कारण कितीही चिकित्सा करण्यास योग्य असले तरीही येथे ती चिकित्सा म्हणजे विषयांतर होईल म्हणून त्याविषयीची चिकित्सा येथे केलेली नाही.

या कथेत ' सत्यमेव जयते ' या वचनाची प्रचीती येते. माता व पुत्र दोघेही सत्याला स्मरुन बोलल्यामुळे या कथेत सत्य या नीतितत्वाची प्रतिष्ठा द्विगुणित झाली आहे, हे तर सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे.

परंतु जबालेसारख्या एका स्त्रीने आपल्या मुलाच्या जन्माचे सत्य त्याला इतके स्पष्टपणे सांगावे याचे खरोखरच नवल तर वाटतेच पण कौतुकही वाटते. या स्पष्टवक्तेपणामुळे मुलाच्या आयुष्यातील शिक्षणासारखे अनेक प्रश्न नक्कीच सुटले असतील आणि जबालाही एकप्रकारच्या मानसिक ताणातून मुक्त झाली असेल हे नक्की. परंतु खरोखरच एखादी आई आपल्याच्या जन्माविषयी इतके स्पष्ट सांगू शकते काय ? कारण हा स्पष्टपणा म्हणजे अनैतिक वर्तनाचा एकप्रकारे दिलेला कबूलीजबाबच होय. मग भलेही ती अनैतिकता त्या स्त्रीवर परिस्थिती अगर तत्सम कारणामुळे लादली गेलेली असो.

येथेही जबालेच्या अनैतिक वर्तनाला परिस्थितीच कारणीभूत असण्याची शक्यता असावी. उदरनिर्वाहासाठी तिला हे काम पत्करावे लागले आहे. ही अनैतिकता तिने स्वतःहून पत्करलेली नाही. आजही कोणतही स्त्री असे अनैतिक वर्तन स्वतःहून करीत असेल असे वाटत नाही म्हणून जबालेच्या या वर्तनासाठी सर्वस्वी तिला दोषी धरता येत नाही. दोष असेलच तर समाजाचा. तत्कालिन सामाजिक परिस्थितीचा असे म्हणावे लागते. आजही समाजात आपल्याला अशा अनेक जबाला दिसतात. परंतु प्रश्न असा आहे की सत्यकामाच्या मातेने जसा निर्भिडपणा स्पष्टपणा दाखविला तशी निर्भीडता

आजची स्त्री दाखवेल काय ? म्हणूनच जबालेविषयी तिरस्कार अगर सहानुभूती न वाटता तिच्याविषयी कौतुक वाटते.

असे जर अनैतिक वर्तन एखाद्या स्त्रीकडून झाले, अगर परिस्थितीने तसे करणे भाग पाडले तर त्या स्त्रीने समर्थपणे , स्पष्टपणे ते कबूल करणेच योग्य असेच ही जबालेची कथा आपल्याला सांगते.

**शकुंतला** :

व्यासांनी लिहिलेल्या शकुंतलाख्यानात शकुंतला कण्वांकडून दुष्यंताकडे येते. दुष्यंत तिला नाकारतो. भर सभेत तिचा अपमान करुन तिला स्पष्टपणे म्हणतो, " मी तुझ्याशी लग्न केले नाही आणि तुझी माझी ओळखही नाही. "

तेव्हा ती स्वाभिमानी स्त्री त्याला उत्तर करते, " हे राजा, तुला सत्याचा आदर नाही. सत्यपराङमुख अशा तुझ्याशी मला सहवासच नको. पती आणि पुत्र यांच्यापेक्षाही सत्य अधिक मूल्यवान आहे.[3]

एवढी मर्यादित गोष्ट बघितली, तर सत्यासाठी शकुंतला दुष्यंतासारख्या सम्राटाकडे पाठ फिरवताना दिसते. दुष्यंत पती आहे व तो आपला स्वीकार करीत नाही हे पाहताच ती त्याला सोडून जाण्याचे धारिष्टय दाखविते. पतीने हाकलले तरीही त्यालाच परमेश्वर मानून त्याच्याजवळ राहण्याचा हेका शकुंतला दाखवित नाहीती राजाने सत्याचा स्वीकार केला नाही म्हणून राजाचा त्याग करण्यासही तयार होते. येथेही सत्य या मूल्याची प्रतिष्ठा गाइलेली आहे पण त्याचबरोबर पतीचे अनेक अन्याय निमूटपणे आजही सहन करणा-या स्त्रीला शकुंतला ही नक्कीच आदर्श आहे. जर स्वतःची बाजू खरी असेल तर पतीकडून झालेला कोणताही अन्याय हा सहन करण्यास अयोग्य आहे. अशावेळी स्वतंत्रपणे स्वाभिमानाने वेळ पडल्यास पतीकडे पाठ फिरवून ही स्त्रीने समर्थपणे जगले पाहिजे असेच व्यासांची शकुंतला सांगते. स्त्रीने आपली असहाय्यता, दौर्बल्य झुगारुन स्वाभिमानाने राहणे पसंत केले पाहिजे म्हणून आजही शकुंतला आदर्श वाटते.

एक नवाच विश्वास व्यासांची शकुंतला स्त्रीला देते. तिच्यातील दौर्बल्य , मानसिक कमकुवतपणा, न्यूनगंड बाजूला सारुन स्त्री आज अन्यायाविरूद्ध उभी राहू शकते. मग तो अन्याय प्रत्यक्ष पतीकडूनही का असेना ? पण त्याचा प्रतीकार करण्यासाठी सर्वसामर्थ्यानिशी स्त्रीने उभे राहिले पाहिजे हेच ही कथा सांगते.

सत्याचे मूल्य सांगणारी व्यासांची शकुंतला अत्यंत तडफदार व स्वाभिमानी स्त्री म्हणून नक्कीच आजही आदर्श वाटते.

**अनसूयेची कथा** :

पातिव्रत्य जपणा-या अनेक स्त्रिया पुराणकथांनी रंगविलेल्या आहेत की, ज्या आज कित्येक सहस्त्रके भारतीय स्त्रीलाच नव्हे तर सर्व भारतीयांना आदर्श व वंद्य आहेत. चिंतामणराव वैद्यांच्या भाषेत जर सांगावयाचे तर पातिव्रत्य हा हिंदू स्त्रियांचा अवर्णनीय अलंकार होऊन बसला आहे.

या पातिव्रत्याच्या सामर्थ्यामुळे त्या पतिव्रता स्त्रियांना अनेकतऱ्हेचे सामर्थ्य, तेजस्विता प्राप्त होत असे. उदाहरण म्हणून आपण अनसूयेची कथा घेऊ.

स्वायंभुव आणि वैवस्वत मन्वंतरातील ब्रह्मदेवाच्या अष्टमानसपुत्रांपैकी एक अशा अत्री ऋषींची पत्नी म्हणजे अनसूया. पौराणिक साहित्यात एक महान पतिव्रता म्हणूनच तिचा निर्देश आढळतो. दहा वर्षे पर्जन्य न पडल्यामुळे जन्मस्थानातील लोक दग्ध होऊ लागले. तेव्हा अनसूयेने आपल्या तप:सामर्थ्याने अत्री आश्रमात गंगा आणली आणि आश्रमाच्या परिसरात फुले -मुळे निर्माण करुन लोकांचे जीव वाचविले असा उल्लेख वाल्मीकी रामायणात आला आहे.

तिच्या तप:सामर्थ्याची कथा मार्कंडेय पुराणात आली आहे ती अशी - मांडव्य ऋषींच्या शापामुळे कौशिक नामक ब्राह्मणाच्या पत्नीला वैधव्य प्राप्त होण्याचा धोका निर्माण झाला. सूर्योदय होताच विधवा होण्याचा शाप मांडव्य ऋषींनी त्या स्त्रीला दिला होता. परंतु ब्राह्मणपत्नी ही अनसूयेची मैत्रीण होती. तेव्हा आपल्या पातिव्रत्य- प्रभावाने सूर्योदयच होणार नाही अशी व्यवस्था अनसूयेने केली. संपूर्ण सृष्टीत हाहा:कार माजला. आपल्या तप:सामर्थ्याने मांडव्य ऋषींचा शाप अनसूयेने खोटा पाडला आणि जगात सूर्योदय पूर्ववत् होईल अशी व्यवस्था.केली.

पातिव्रत्य म्हणजे केवळ पतीवरील निष्ठा एवढाच मर्यादित अर्थ येथे नव्हे तर पातिव्रत्यामुळे स्त्रियांजवळ एकप्रकारचे नैतिक सामर्थ्य प्राप्त होत असे. ते सामर्थ्य, ते तेज इतके प्रभावी असे की अनसूयेसारखी पतिव्रता स्त्री ऋषींचा शापही खोटा पाडीत होती वस्तुत: ऋषींच्या शापवाणीला उ:शापाखेरीज

अन्य पर्याय नसे. तो कोणालाही परत घेता येत नसे अगर त्या शापाचे सामर्थ्यही कमी करता येत नसे. परंतु अनसूयेने आपल्या सामर्थ्याच्या साहाय्याने तो शाप खोटा पाडला. कृष्णाने सुदर्शनाच्या साहाय्याने अर्जुनाला प्रतिज्ञापूर्ती करता यावी म्हणून तात्पुरता सूर्यास्त घडविला. परंतु अनसूयेने तर सूर्योदय होऊच दिला नाही. एवढेच नव्हे तर ब्राह्मणपत्नीचा धोका टळला हे बघताच सूर्योदय पुनः पुर्ववत् होईल अशीही व्यवस्था केली.

एवढे असामान्य सामर्थ्य, तपोबल त्याचप्रमाणे मनोबलही अनसूयेकडे होते हे बघून खरेच मन थक्क होते. तिने केवळ ऋषींचा शाप खोटा ठरविला नाही तर त्यासाठी निसर्गचक्र थांबविले. सूर्योदय होऊ दिला नाही व पुनः पूर्ववत् होईल अशी व्यवस्था केली. निसर्गाच्या नित्यनियमात बदल करण्याचे असामान्य सामर्थ्य तिजजवळ होते. अर्थात् या सर्व वर्णनात अतिशयोक्ती आहे. हे वर्णन अतिरंजित वाटते. मांडव्य ऋषींच्या क्रोधापासून आपली सखी असलेल्या ब्राह्मणपत्नीला अनसूयेने वैधव्यापासून वाचविले हे खरे असेल परंतु त्यासाठी तिने केलेले उपाय काल्पनिक वाटतात.

अर्थात् हे अतिशयोक्तीचे वर्णन माणसावर नैतिकतेचे चारित्र्याचे महत्व बिंबवण्यासाठी आलेले आहे, हे निःसंशय. आजही अशा नैतिक सामर्थ्याची गरज माणसाला आहे, हे नक्कीच.

**सावित्री** :

पतिव्रता सावित्रीचे नाव माहीत नाही अशी एकही व्यक्ती भारतात सापडणार नाही. प्रत्येक हिंदूच्या तोंडी सावित्रीचे नाव आहे इतकेच नव्हे तर तिच्या तेजस्वी चरित्राचे पुण्यस्मरण करण्यासाठी ज्येष्ठी पूर्णिमेस तीन दिवस उपवास करण्याची पद्धत आजही आहे.

भद्रनरेश अश्वपतीची कन्या सावित्री. ती मोठी झाली पण कोणीही राजपुत्र तिला वरण्यास तयार होईना. तेव्हा राजाज्ञेने ती स्वतःच वरसंशोधनार्थ बाहेर पडली. शाल्व देशाचा राजा द्युमत्सेन याचा पुत्र सत्यवान याला तिने पसंत केले. द्युमत्सेन अंध होता व शत्रूंनी राज्यभ्रष्ट केल्यामुळे तो आपली पत्नी व मुलगा सत्यवान यांच्यासह अरण्यात रहात होता.

सत्यवानाला मनाने वरून सावित्री घरी परतली, त्यावेळी नारदमुनी तेथे आलेले होते. सावित्रीने

सत्यवानाची निवड केली, हे ऐकून नारदाला दुःख झाले ते अश्वपतीला म्हणाले, "सत्यवान अल्पायुषी असून, आजपासून एका वर्षाने त्याचा मृत्यू होणार आहे. तेव्हा सावित्रीने दुसरा वर निवडावा" परंतु सावित्री आपल्या निवडीबाबत अढळ राहिली.

त्यानंतर अश्वपतीने सावित्रीचा सत्यवानाशी विवाह करून दिला. सावित्री सासूसासरे व पती यांची सेवा करण्यात ती आपला काल घालवू लागली. सत्यवानाचा मृत्यू चार दिवसांवर येऊन ठेपला तेव्हा सावित्रीने त्रिरात्र व्रत केले. चौथा दिवस सत्यवानाचा मृत्यूदिन होता. त्या दिवशी सत्यवान दर्भ व काष्ठे आणण्यासाठी वनात गेला, तेव्हा सावित्रीही त्याच्याबरोबर गेली. सरपणासाठी लाकडे तोडीत असताना एकाएकी सत्यवानाचे डोके दुखू लागले, म्हणून तो सावित्रीच्या मांडीवर डोके टेकून थोडा वेळ निजला. तेवढयात यमदूत त्याचे प्राण हरण करण्यासाठी तेथे आले. पण सावित्रीच्या तेजामुळे ते सत्यवानाचे प्राण हरण करू शकले नाहीत. तेव्हा यमधर्म स्वतः तेथे आला आणि सत्यवानाचे प्राण खेचून जाऊ लागला. सत्यवानाच्या शवाला कोणी स्पर्श करू नये म्हणून जरूर ती तजवीज करून सावित्रीही यमधर्माच्या मागून निघाली. यमधर्माने तिला परत जायला सांगितले, तरी ती परत फिरली नाही. हळूहळू यमाशी युक्तिवाद करून तिने सास-याचे डोळे व गेलेले राज्य परत मिळविले. पित्यासाठी कीर्ती व तेजस्वी पुत्र यांची मागणी केली. व शेवटी सत्यवानाचे प्राणही परत मिळविले. त्यामुळे सर्वांना फार आनंद झाला.[5]

अशी ही जिने आपल्या दिव्यतेने, मांगल्याने निष्ठेने मृत्यूवरही जय मिळविला.

सावित्री एक राजकन्या. तिचा पती निवडण्याचे स्वातंत्र्य तिला पित्याने दिले पण ते काहीसे अगतिकपणे दिलेले आहे. सावित्रीला कोणीही वरण्यास तयार होत नव्हते हे ही काहीसे आश्चर्यकारक आहे. तिच्या गुणसंपदेमुळे तिला वरायला कोणीही तयार नव्हेते हे तर अत्यंत चमत्कारिक काहीसे गूढ वाटते. कदाचित् तिची गुणसंपदा व तेजस्विता इतकी दिव्य असावी की बहुतांशी राजपुत्र त्यापुढे नम्र झाले असावेत व अत्यादरापोटी सहचारिणी म्हणून तिचा स्वीकार करू शकले नसावेत. या परिस्थितीत पित्याचे दुःख अगतिकता नाहीसे करण्यासाठी सत्यवान अल्पायुषी आहे हे नारदाकडून कळूनही तिने त्यालाच वरण्याचे नक्की केले असावे. कारणमीमांसा काहीही असो परंतु सावित्रीची निष्ठा मात्र असामान्य होती हे खरे.

राजवैभवात राहिलेली ती राजवैभव गेलेल्या आपल्या सास-याच्या घरी पूर्णतः एकरूप झाली. आपल्या ऋजू स्वभावाने केवळ सासू-सास-यांनाच तिने जिंकले नाही, तर प्रत्यक्ष मृत्यूवरही तिने विजय संपादन केला. प्रत्यक्ष यमराजाला ही तिने आपल्या संभाषणाने संतुष्ट केले व पतीचे प्राण परत मिळविले. ती संभाषण चतुर होती, निर्भीड होती. पतिवरील तिचे प्रेम, निष्ठा अटळ होती. तिने केवळ पतिचेच प्राण परत मागितले नाहीत तर सास-याचे अंधत्व नाहीसे करून गत राजवैभव परत मिळविले. आपल्या पित्यासाठीही तेजस्वी पुत्रांची कामना केली. प्रत्यक्ष पती मरण पावलेला आहे, यमराज त्याचा आत्मा घेऊन जात आहेत व त्या पाठोपाठ जाणारी सावित्री न डगमगता निर्भीडपणे पतीचे व पित्याचे घराणे यांचे कल्याण साधते आहे. कोणत्याही सर्वसामान्य स्त्रीला हे सर्वस्वी अशक्य आहे. स्वतःवर एवढा दुःखाचा, संकटाचा कडा कोसळला असतानाही, स्वतःचे ते दुःख बाजूला सारून सासरा व पिता यांच्या कल्याणाची मागणी करण्यात सावित्रीचे असामान्यत्व दिसून येते. निर्भीडता, संयम, पतिनिष्ठा, पतिप्रेम, असामान्यबुद्धी यांचे विलोभनीय दर्शन सावित्रीच्या ठायी होते.

महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदासांनी 'भारतीय जीवनादर्श' या आपल्या पुस्तकात सावित्रीविषयी काढलेले उद्गार अत्यंत मार्मिक आहेत, ते म्हणतात, "भद्रदेशची राजकन्या असूनही ऐश्वर्यशील जीवनाचा मोह तिच्या अंतःकरणात कधी उत्पन्न झाला नाही. मृत्यूसारखी भयानक गोष्ट देखील तिच्या विलक्षण चारित्र्याच्या ध्येयवादाला बाधा उत्पन्न करू शकली नाही. दारिद्र्य व मृत्यूच्या चिंतेची मनाला लागलेली टोचणी तिच्या उग्र निश्चयापासून तिला परावृत्त करू शकली नाही. जीवन हे एक चंदन आहे, जितके घासले जाईल तितका त्याचा परिमल आसमंतात अधिक दरवळून निघेल. जीवन हे सोने आहे, सुरक्षिततेच्या तिजोरीत ते केवळ बंद करून ठेवले तर त्यावर मलिनतेची पुटे चढतात. जितके ते अधिक तापवले जाईल तितके ते अधिकाधिक दीप्तिमान बनेल. सावित्रीच्या सर्व श्रेष्ठ जीवनाचा हाच अर्थ आहे, हाच संदेश आहे."[6]

म्हणूनच सुशिक्षित, अशिक्षित अशा अद्ययावत् भारतीय स्त्रियांचे सावित्री हे सदाचे पूज्यस्थान आहे.

**मैत्रेयी** :

अत्यंत विद्वान स्त्री. मैत्रेयी ही जनक राजाच्या मित्र नावाच्या प्रधानाची मुलगी.

गार्गीच्या सहवासात मैत्रेयी ही सुद्धा ब्रह्मवादिनी म्हणून प्रसिद्धीस आली. पुढे तिचा विवाह याज्ञवल्क्याशी झाला.

याज्ञवल्क्य गृहस्थाश्रम सोडून संन्यास घ्यायला निघाला त्यावेळी त्याने आपली संपत्ती मैत्रेयी व कात्यायनी या आपल्या दोघी पत्नींना वाटून द्यावयाचे ठरवले. त्याचा तो प्रस्ताव ऐकताच मैत्रेयी त्याला म्हणाली, "भगवन्, या धनाने जरी सारी पृथ्वी मला मिळाली तरी मी अमर होईन का?" त्यावर याज्ञवल्क्य म्हणाला, "नाही, धनाने तुझे जीवन समृद्ध व भोगमय होईल. संपत्तीने कधी अमृतत्व मिळत नसते." त्यावर मैत्रेयी म्हणाली, "ज्यांनी मी अमर होऊ शकत नाही ते भोग घेऊन मी काय करू? अमृतत्वाचे तुम्ही जे साधन जागता तेच मला सांगा." असे म्हणून तिने सर्व धन लाथाडले.[7]

बृहदारण्यकातील ही गोष्ट स्त्रीचा एक वेगळाच पैलू दर्शविते. मैत्रेयी ही एक विद्यार्थिनी होती. अत्यंत प्रगल्भ. तिला ब्रह्मानंद प्राप्त करून घ्यावयाचा होता. त्या तिच्या ध्येयात पतीने दिलेली संपत्ती म्हणजे एक अडचण होती आणि अशा या संपत्तीला, ऐहिक सुखाला तिने पूर्णतः निश्चयी, निग्रही मनाने लाथाडले. स्त्री ही जात्याच सुखलोलुप, संपत्तीला, ऐश्वर्याला भुलणारी असा समज आहे. परंतु मैत्रेयीसारख्या स्त्रीने तो खोटा करून दाखविला आहे. ज्ञानासाठी तिने सर्वस्वाचा त्याग केला आहे. एकदा का एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की तो काही झाले तरी तो पूर्ण करणारच. ध्येयपूर्तीसाठी सतत प्रयत्नशील, त्यागी, निर्मोही, संयमी अशी ही आदर्श विद्यार्थी मैत्रेयी भारतीयांना नेहमीच वंद्य व आदरणीय आहे.

**चित्रलेखा** :

एका राजकन्येची ही सखी परंतु अनेक कलांमध्ये ती अत्यंत पारंगत होती. तिच्याविषयीची गोष्ट शिवपुराणात आलेली आहे ती अशी.

बलिदैत्याचा पुत्र बाणासुर याची कन्या उषा हिचे श्रीकृष्णपौत्र अनिरूद्ध ह्याच्यावर प्रेम बसले. यासंबंधी अत्यंत कल्पनारम्य आख्यायिका पद्म व शिवपुराणात आलेली आहे. एकदा उषा महालात झोपली

असता एका सुंदर तरूणासमवेत समागम झाल्याचे स्वप्न तिला पडले. तिची सखी चित्रलेखा हिने त्याकाळच्या विशेष स्वरूपसुंदर अशा राजपुत्रांची रंगचित्रे हिला काढून दाखविली. अनिरूद्धाच्या चित्रावरून उषेला त्याची ओळख पटली आणि उषा त्याच्या प्रेमात पडली.

उषेच्या विनंतीवरून चित्रलेखा आपल्या योग सामर्थ्याच्या साहाय्याने अठ्ठेचाळीस तासात बाणासुराच्या शोणितपुर नगराहून द्वारकेस जाऊन पोहोचली आणि हे सारे नगर कृत्रिम अंधकारामध्ये आच्छादून तिने निद्रिस्त अनिरूद्धाला शोणितपुर येथे पळवून आणले. पुढे कृष्णाने शोणितपुरावर हल्ला केला. बाणाला पराभूत करून उषा अनिरूद्धाचा विवाह घडवून आणला. (शिवपुराण-रूद्रसंहिता-युद्धखंड)[8]

गार्गी-मैत्रेयी सारख्या स्त्रिया ब्रह्मवादिनी म्हणून ओळखल्या जात असत हे आपण पाहिलेच आहे. त्या अत्यंत विदुषी होत्या. परंतु चित्रलेखा ही असुर राजकन्येची मैत्रीण ही उत्कृष्ट चित्रकार होती. तिने त्या काळातल्या सर्व सुंदर राजपुत्रांची चित्रे रेखाटली. ती सुद्धा इतकी हुबेहूब की चित्रांवरून उषेच्या स्वप्नीचा राजकुमार उषेला ओळखता आला. एका सर्वसामान्य मुलीने तत्कालिन सर्व सुंदर राजपुत्रांची हुबेहूब चित्रे रेखाटावीत ही मनाला न पटणारी गोष्ट आहे. इतकेच नव्हे तर ती योगसामर्थ्याने द्वारकेस पोहोचते. द्वारका अंधकाराने आच्छादून निद्रिस्त अनिरूद्धाला तिने शोणितपुर येथे आणले. म्हणजेच ती योगातही पारंगत होती असा उल्लेख आहे. अर्थात् हे सर्व कथानक अतिशयोक्तीपूर्ण व काल्पनिक वाटते. तरीही मैत्रीणीसाठी असलेली तळमळ सत्य आहे हे जाणवते.

चित्रलेखेला प्राप्त असलेल्या सर्व कलांचा उपयोग तिने मैत्रीणीच्या सुखासाठी केला. त्यावेळी तिने कसलाही मागचा पुढचा विचार केला नाही. अत्यंत निर्भयता दाखवून केवळ मैत्रीसाठी तिने अक्षरशः प्राणांचीही पर्वा केली नाही. अत्यंत निःस्वार्थी पण हुषार अशी ही चित्रलेखेची व्यक्तिरेखा अत्यंत मोहक आहे. अर्थात् कथेचा सांगाडा जरी काल्पनिक व अतिशयोक्तीचा असला तरी त्यातून मित्रप्रेमाचा मिळणारा संदेश मात्र खरा आहे. तसेच तत्वज्ञानाप्रमाणेच इतर अध्ययनशाखांतही त्या काळी स्त्री निपुण होती हे ही चित्रलेखेची ही कथा सांगते.

**शर्मिष्ठा** :

महाभारतात अगर मत्स्यपुराणात आलेली शर्मिष्ठेची कथा अत्यंत त्यागी व कर्तव्यदक्ष आदर्श स्त्री आपल्यापुढे उभी करते.

शर्मिष्ठा ही दानवराजा वृषपर्वन् याची कन्या आणि दानवांचे गुरु शुक्राचार्य यांच्या एकुलत्या एका कन्येची देवयानीची मैत्रीण, एकदा देवयानी व शर्मिष्ठा आपल्या मैत्रीणींसह जलक्रीडा करीत होत्या. पाण्याच्या बाहेर आल्यावर शर्मिष्ठेने चुकून देवयानीची वस्त्रे परिधान केली. यावरुन दोघीत भांडण जुंपले. शर्मिष्ठेने देवयानीची 'भिका-याची पोर' अशा शब्दात निर्भत्सना केली व तिला खड्डयात ढकलून दिले. चिडलेल्या देवयानीची शुक्राचार्यांना समजूत घालता येईना तेव्हा ते संतापून राजा वृषपर्व्याकडे आले. त्यांनी "शर्मिष्ठेमुळे दुखावलेल्या देवयानीची समजूत घाल अन्यथा मी तुझ्या राज्यातून निघून जाईन " अशी धमकी राजास दिली तेव्हा राजाने घाबरुन देवयानीची इच्छा विचारली. रागाने देवयानीने "शर्मिष्ठा माझी दासी झाली पाहिजे व माझ्या विवाहानंतर ही हजार सामान्य दासींप्रमाणे तिने माझी सेवा करण्यासाठी माझ्या सासरीही आले पाहिजे," ही शिक्षा ऐकून शर्मिष्ठा देवयानीकडे आली व नम्रपणे म्हणाली,"तुझ्या आज्ञेनुसार एक हजार दासींसमवेत मी आले आहे. विवाहानंतर तू जेथे जाशील तेथेही आम्ही तुजबरोबर येऊ."

येथे शर्मिष्ठेच्या रुपाने त्यागी व देवयानीच्या रुपाने स्वार्थी अशा परस्परविरोधी दोन स्त्रिया उभ्या आहेत. वास्तविक शर्मिष्ठा ही एका राजाची कन्या व देवयानी ही त्या राजाच्या गुरुची कन्या. एका राजकन्येने खेळात भांडून काही अपशब्द काढले म्हणून देवयानीने तिला स्वतःची दासी करणे अत्यंत हीनपणाचे कृत्य होय. देवयानी म्हणजे अत्यंत तापट, हेकट, स्वार्थी व सूडभावनेने पेटलेली स्त्री आहे. तर दुसरीकडे शर्मिष्ठा म्हणजे कर्तव्यदक्ष, त्यागी आज्ञाधारक म्हणून अमर ठरली आहे. शुक्राचार्य हे राजाचे गुरु. त्यांचा कोप होऊन राजाला व प्रजेला त्रास होऊ नये म्हणून स्वतःच्या जीविताचे बलिदान करण्यास शर्मिष्ठा तयार झाली. वास्तविक स्वतःच्या अनेक दासी असतानाही, एक राजकन्या असूनही ती दास्य पत्करते व ते हो देवयानीसारख्या शीघ्रकोपी स्त्रीचे. अर्थात पुढच्या आयुष्यात तिची भूमिका ही वेगळी आहे पण काही काळ का

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

होईना शर्मिष्ठेने दास्य पत्करले हे सत्य आहे.

प्रजाननांचे व सर्व दानववंशाचे हित साधण्यासाठी तिने स्वतःवर ही कठोर शिक्षा लादून घेतली. स्वहितापेक्षा प्रजाहिताला महत्व देणारा राजाही होताच. परंतु शर्मिष्ठेसारखी त्याची कन्या ही व्यक्तिहितापेक्षा प्रजाहिताला अधिक महत्व देणारी होती. कन्या म्हणून पित्याला ही गुरुकोपापासून तिने वाचविले. परंतु राजकन्या म्हणून सर्व प्रजाजनांनाही गुरुच्या कोपापासून वाचविले. कन्या म्हणून पित्याचे तसेच समाजाचे ऋण फेडणारी व त्यासाठी शांतपणे, धीराने स्वतःचे जीवनही बलिदान करण्यास न कचरणारी शर्मिष्ठा नक्कीच स्मरणीय आहे.

आजच्या या कालातही कन्या वा पुत्राने नव्हे तर कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने कुटुंबासाठी, समाजासाठी देशासाठी काही बलिदान करणे गरजेचे आहे. भलेही अगदी जीवनसर्वस्वाचे नाही पण संकुचित स्वार्थांचा त्याग करणे गरजेचे आहे, तरच आजचा हा भ्रष्ट, स्वार्थी समाज आदर्शाप्रत वाटचाल करु शकेल असे वाटते.

तसेच तत्कालिन समाजरचनेत गुरुला अत्यंत मानाचे स्थान होते असे दिसते. गुर्वाज्ञा तर राहोच परंतु गुरुचे मन दुखावण्यासही राजा तयार नसे असे दिसते. राजावर व राज्यव्यवस्थेवर गुरुचे वर्चस्व होते हे स्पष्ट आहे.

तात्पर्य,"शर्मिष्ठेने आपल्या कर्तव्यदक्षतेने, त्यागाने आज्ञाधारकपणे सर्व भारतीयांच्या तोंडी आपले नाव अमर केले."[10]

**अम्बा :**

काशी देशाची राजकुमारी अम्बा. काशी राजाच्या तीन कन्यांमध्ये ही ज्येष्ठ असून हिच्या अन्य दोन बहिणींची नावे अम्बिका व अम्बालिका अशी होती. काशीराजाने आपल्या तीनही कन्यांचे स्वयंवर रचले. भीष्माने विचित्रवीर्यासाठी स्वबलावर ह्या तिघी बहिणींचे हरण केले.[11]

हस्तिनापुरी आल्यावर भीष्माला हिने आपले प्रेम शाल्वराजावर आहे असे सांगून विचित्रवीर्याशी विवाहास नकार दिला. तेव्हा भीष्माने हिला शाल्वाकडे पाठविले. परंतु स्वयंवरात भीष्माने आपला पराभव

केला आहे. या सबबीवर शाल्वाने हिच्याशी लग्न करण्यास नकार दिला. तेव्हा अपमानित अंबेने भीष्माला विवाह करण्याची विनंती केली. परंतु ब्रह्मचर्याच्या प्रतिज्ञेमुळे त्याने अंबेची मागणी स्वीकारली नाही.

अशाप्रकारे सर्वच बाजूने निराधार, निराश्रित अशा या आपल्या स्थितीस भीष्मच कारणीभूत आहे म्हणून त्याच्या सूडाचा विचार करत ती हिमालयावर तपासाठी गेली. तेथे भीष्माचे गुरु परशुरामांनी भीष्माचे मन वळविण्याचा केवळ प्रयत्नच केला नाही तर त्याच्याशी युध्द सुध्दा केले. परंतु ते युध्द अनिर्णीत ठरले.[12] (म.उद्योगपर्व 173.176) तेव्हा तिने शंकराची कडक उपासना केली व प्रसन्न झालेल्या शंकराला भीष्मवधाची आपली इच्छा सांगितली. पण'या जन्मी तुला हे शक्य नाही. पुढील जन्मी तू द्रुपदाच्या घरी कन्यारुपाने जन्मास येऊन नंतर तुला पुरुषत्व प्राप्त होईल व तू शिखंडी या नावाने प्रसिध्दीस येऊन भीष्मास ठार मारशील.' असा वर शिवाने हिला दिला. अशाप्रकारे आपले मनोरथ पूर्ण झालेले पाहून अंबेने अग्नीमध्ये उडी घेऊन देह त्याग केला.[13] (महा. उद्योग. 188)

या कथेत सूडाने पेटलेली स्त्री अंबेच्या रुपाने आपल्यापुढे येते. खरे तर शाल्वावरील स्वतःचे प्रेम तिने सांगताच भीष्माने मोठया उदार अंतःकरणाने तिला शाल्वाकडे पाठविले होते. तिला स्वबलावर भीष्माने जिंकले होते. त्यामुळे तो वास्तविक बळेच तिचा विवाह विचित्रवीर्याशी लावू शकला असता व त्यात तत्कालीन व्यवस्थेनुसार काही गैर वा वावगे ठरले नसते. परंतु भीष्माने अत्यंत उदार अंतःकरणाने तिची शाल्वाकडे पाठवणी केली.

परंतु शाल्वाने स्वयंवरात आपण पराभूत झालो आहोत म्हणून अंबेचा स्वीकार न करता तिला परत पाठविले. आपल्या पराभवाची शाल्वाने पुढे केलेली ही सबब मात्र लंगडी वाटते. त्याचेही जर अंबेवर प्रेम असते तर भीष्माच्या या निर्णयाचा उचित गौरव करुन त्याने अंबेचा स्वीकार करावयास हवा होता. म्हणून शाल्वाची सबब खोटी वाटते. त्याच्याचमुळे अंबेला परत यावे लागते. त्यामुळे शाल्वाच्या प्रेमाविषयीही साशंकता उत्पन्न होते. वास्तविक अंबेची ही निराधार अवस्था प्राप्त करुन देण्यास शाल्वही जबाबदार आहे. दुस-याने जिंकलेली स्त्री आपण स्वीकारणे हे त्याला कमीपणाचे वाटले असावे. येथे त्याचा पुरषी अहंकार

दिसतो. अंबेचे मात्र शाल्वावर निरतिशय प्रेम होते आणि म्हणून आपल्या निराश्रित अवस्थेस अंबेने केवळ भीष्मांनाच कारणीभूत ठरविले व त्यांच्या सूडाचा ती विचार करु लागली.

भीष्माच्या सूडासाठी तिने हरत-हेने प्रयत्न केलेले दिसतात. भीष्मांचे गुरु परशुरामांची मदत घेतली परंतु ती निष्फळ ठरलेली दिसता तिने शंकराची उपासना करुन त्याच्याकडून वर प्राप्त केला. म्हणजे जवळजवळ संपूर्ण आयुष्य भीष्मावर सूड उगविण्यासाठी व्यतीत केले. आमरण झगडा केला. एवढेच नव्हे तर प्राप्त जन्मात ते शक्य नाही हे दिसताच पुढचा जन्म प्राप्त करुन त्या जन्मातही भीष्मवध हेच प्राप्तव्य मानले.

अर्थात कथेचा हा उत्तरार्ध वास्तव वाटत नाही. शिखंडीने भीष्मवध केला हे सांगण्यासाठी कदाचित् कथाकाराने ती कथा अंबेच्या या कथेला जोडली असावी.

या कथेत प्रकर्षाने आणखी एक गोष्ट आणि ती म्हणजे अंबेला भीष्माने जिंकल्यानंतर तिच्या माहेरहून पुनः तिची काहीही विचारपूस झालेली नाही. वस्तुतः तिच्या वडिलांनी तिचे स्वेच्छा स्वयंवर ठेवले असते तर तिने नक्कीच शाल्वाला पसंत केले असते व तिच्या आयुष्याची ही शोकांतिका टळली असती.

भीष्माने तिला नेल्यानंतर एकदाही तिची विचारपूस तिच्या वडिलांकडून झाली नाही याचेच आश्चर्य वाटते. एकदा सासरी गेलेली मुलगी माहेरला मेली. अशात-हेचा काहीसा टोकाचा सूर या कथेतही दिसतो. तिच्या या अगतिकतेला तिचे वडिलही जबाबदार दिसतात. या असहायतेमुळे निराश होऊन तिने आपले जीवन संपविले. स्वतःची काहीही चूक नसताना तिची झालेली ससेहोलपट पाहून अंतःकरण द्रवल्याशिवाय रहात नाही व त्याचबरोबर तत्कालीन पुरुषप्रधान व्यवस्थेची चीड उत्पन्न झाल्याशिवायही रहात नाही.

अशात-हेने पुराणकथांनी अनेक महान स्त्रिया पुराणकथांनी रंगविलेल्या आहेत. त्यापैकी काहीच स्त्रियांच्या कथा येथे दिलेल्या आहेत. "त्यांनी दाखविलेले अनासक्तियोग, भक्ति, सेवा, कर्तव्य वगैरे गुण प्रत्येक भारतीय स्त्रीच्या रक्तातच जणू भिनलेले आहेत. बहुतेक भारतीया स्त्रियांनी मातृपद व पत्नीपद या स्त्रीच्या नैसर्गिक भूमिका म्हणून मान्य केलेल्या आहेत आणि यातच त्यांच्या कमकुवतपणाचे तेजस्वितेचेही बीज साठविलेले आहे."[14] (भारतातील थोर स्त्रिया : संपादक : प्राचार्य ह.भ.प. शं.वा. दांडिकर अनुवादक डॉ.

सौ. शरयू बाळ )

विवेकानंदानी अभिमानाने काढलेल्या उद्‌गारांनी या प्रकरणाचा समारोप करुया. ते म्हणतात.

" भारताच्या पवित्र भूमीवर अजूनही सीता अगर सावित्री यांचे आदर्श जगणा-या महिला दिसतात. सेवा, त्याग, प्रेम, सहानुभाव, समाधान व औदार्य या, गुणांनी मंडित अशा स्त्रिया अजूनही आमच्या समाजात बहुसंख्येने आहेत. "

* * *

1. ऐतरेय ब्राह्मण. 9.17

2. छांदोग्य उपनिषद

3. महाभारत आदिपर्व 89 100

4. मार्कंडेय पुराण - 16

5. महाभारत वनपर्व 293.299

6. भारतीय जीवनादर्श बाळशास्त्री हरदास

7. बृहदारण्यक 45.3.4

8. शिवपुराण - रुद्रसंहिता - युद्धखंड

9. महाभारत आदिपर्व 78.80, भागवत पुराण 9.18

10. भारतातील थोर स्त्रिया - संपादक ह.भ.प.शं.वा.दांडेकर
अनुवादक डॉ. सौ.शरयू बाळ पान नं. 215

11. महाभारत आदिपर्व - 16

12. महाभारत उद्योगपर्व 173 .176

13. महाभारत उद्योगपर्व 188

14. भारतातील थोर स्त्रिया - संपादक प्रा. ह.भ.प.शं.वा.दांडेकर
अनुवादक डॉ.सौ. शरयू बाळ


* * *